

# मराठी (प्रथम भाषा) लेख-१२

**आसावरी सुर्वे, शाळा :** विद्या मंदिर, दहिसर

**मराठी व्याकरण**

विद्यार्थी मित्रांनो,

पुनर्रचित अभ्यासक्रमात व्याकरणाच्या भागास १० गुण निश्चित केलेले आहेत. अर्थात व्याकरणातील काही निवडक घटकांचा अभ्यास करावयाचा आहे. प्रश्नपत्रिकेत ह्याचा सातवा क्रमांक आहे. आता या लेखामध्ये व्याकरणाधारित घटकांचा अभ्यास करावयाचा आहे. तेव्हा प्र. ७ वा याचे स्वरूप पाहू.

**प्र. ७ वा- क)** एका अलंकाराचे लक्षण सांगून उदाहरण द्या.

★ या उपप्रश्नास २ गुण आहेत.

★(१ गुण- लक्षणास, १ गुण- उदाहरणास अशी विभागणी आहे.)

★एकूण चार अलंकार अभ्यासावे लागणार आहेत.

★ परीक्षेत त्यापैकी दोन अलंकार विचारले जातील व एकाच अलंकाराचे लक्षण व उदाहरण द्यावे लागेल.

★ योग्य ठिकाणी अलंकाराचे स्पष्टीकरणही द्यावे, परंतु त्याला गुणदान केले जाणार नाही.

अलंकार- दृष्टान्त, श्लेष, स्वभावोक्ती, अनन्वय

**१) दृष्टान्त-**

लक्षण- एखाद्या विषयाचे वर्णन करून झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्याकरिता त्याच अर्थाचा दाखला दिल्यास 'दृष्टान्त' अलंकार होतो.

उदाहरण- 'लहानपण दे गा देवा। मुंगी साखरेचा रवा।
ऐरावत रत्न थोर। त्यासी अंकुशाचा मार।'

स्पष्टीकरण- लहानपणात सुख असते, तर मोठेपणात यातना सहन कराव्या लागतात. हे पटवून देण्यासाठी मुंगी आणि ऐरावताचे उदाहरण दिलेले आहे. मुंगीला साखर खायला मिळते, तर ऐरावताला अंकुशाचा मार खावा लागतो.

**२) श्लेष-**

लक्षण- एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती साधते, तेव्हा श्लेष हा अलंकार होतो.

उदाहरण-

'मित्राच्या उदयाने कोणाला आनंद होणार नाही ?'

स्पष्टीकरण- या उदाहरणात 'मित्र' हा शब्द दोन अर्थांनी आलेला आहे. 'मित्र' म्हणजे 'सूर्य' आणि 'मित्र' म्हणजे 'सखा' म्हणून येथे 'श्लेष' हा अलंकार झाला आहे.

**३) स्वभावोक्ती-**

लक्षण- जेव्हा एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे किंवा त्याच्या हालचालीचे यथार्थपणे, हुबेहूब व वैशिष्ट्यपूर्ण वर्णन केले जाते तेव्हा 'स्वभावोक्ती' हा अलंकार होतो.

उदाहरण- वर भिवई चढली दात दावती ओठ
छातीवर तुटली पटबंदाची गाठ
डोळ्यात उठे काहूर ओलवे काठ
म्यानातून उसळे तरवारीची पात

**४) अनन्वय-**

लक्षण- जेव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दली जाते, तेव्हा 'अनन्वय' हा अलंकार होतो.

उदाहरण-

आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी।

**ख)** कोणतेही चार शब्द शब्दसिद्धीच्या कोणत्या प्रकारात येतात ते लिहा.

★ या उपप्रश्नास २ गुण आहेत.

★प्रश्नपत्रिकेत ६ शब्द दिले आहेत. त्यापैकी चार शब्दांचे साधित शब्द महत्त्वाचे आहेत.

★प्रत्येकास १/२ गुण मिळतो.

★ साधित शब्दांचे उपसर्गघटित, प्रत्ययघटित, अभ्यस्तघटित व समासघटित असे चार प्रकार आहेत. विचारलेल्या शब्दाचा योग्य प्रकार अभ्यासावा.

★ **उपसर्गघटित शब्द-**

मूळ शब्दाच्या किंवा धातूच्या मागे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही साधित शब्द बनतात. या अक्षरांना 'उपसर्ग' असे म्हणतात. ही अक्षरे अव्ययरूप असतात. ती केव्हा केव्हा त्या धातूचा किंवा शब्दाचा मूळ अर्थ बदलतात. उदा. 'हार' या शब्दाचा मूळ अर्थ 'पराभव' किंवा 'माळ' असा आहे, पण मागे उपसर्ग लागल्यामुळे त्याच्या मूळ अर्थामध्ये फरक होतो. उदा. आहार आहार उपहार उपहार इ.

हीच गोष्ट इतर धातूंच्या बाबतीत होते. उपसर्ग हे स्वतंत्रपणे येत नाहीत. शब्दांच्या पूर्वी उपसर्ग लागून जे शब्द तयार होतात त्यांना 'उपसर्ग घटित' शब्द असे म्हणतात. मराठीमध्ये तीन प्रकारचे उपसर्ग आहेत.

१) संस्कृत, २) मराठी ३) फारसी- अरबी

उदा. अजिंक्य, अतिक्रम, प्रतिकार इ.

**प्रत्ययघटित**

शब्दाच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून जो शब्द तयार होतो तो प्रत्ययघटित होय.

उदा. खोदाई, पुजारी, झोपाळू, मासिक. इ.

**अभ्यासघटित**

अभ्यास याचाच अर्थ पुनरावृत्ती होणे.

उदा. घरघर, हळूहळू, लाललाल इ.

**सामासिक शब्द-**

दोन किंवा अधिक शब्द एकत्र येऊन जो जोडशब्द बनतो त्यास सामासिक शब्द असे म्हणतात. सामासिक शब्दांनाच समासघटित शब्द असे म्हणतात.

उदा. देवघर, नीलकंठ, घरजावई, दारोदार इ.

**ग)** सूचनेप्रमाणे कोणत्याही दोन वाक्यात बदल करून ती वाक्ये पुन्हा लिहा.

★ या उपप्रश्नास दोन गुण आहेत.

★ प्रत्येक वाक्यास १ गुण आहे.

★ प्रश्नात ३ वाक्ये दिली जातात पैकी २ वाक्ये सोडवावीत.

**केवलवाक्य** - ज्या वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते त्यास केवलवाक्य असे म्हणतात. हे केवलवाक्य विधानार्थी, प्रश्नार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी किंवा नकारार्थीही असू शकते. उदा. सेनापतीला वीरमरण आले.

**मिश्रवाक्य -** जेव्हा दोन वाक्य परस्परांवर अवलंबून असतात आणि ती गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून एक वाक्य तयार होते तेव्हा त्यास 'मिश्रवाक्य' असे म्हणतात. गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यये चार प्रकारची आहेत.

१) स्वरूपबोधक- उदा. मी निवृत्त झाले की, गायनाचा छंद जोपासेन.

२) कारणबोधक- उदा. तू भरपूर व्यायाम घे, कारण तुला काही मिळवायचं.

३) उद्देशबोधक- उदा. घर स्वच्छ राहावे म्हणून मी खूप काळजी घेते.

४) संकेतबोधक- उदा. जर पाऊस पडला तर हिरवे रान दिसेल.

**संयुक्तवाक्य** - दोन किंवा अधिक केवलवाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असता जे अर्थपूर्ण वाक्य बनते ते संयुक्तवाक्य होय.

प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्यये चार प्रकारची आहेत.

१) समुच्चयबोधक-

उदा. आम्ही संगणक जाणू लागलो आणि जगातील माहिती मिळू लागली.

२) विकल्पबोधक- उदा. संत- महंतांना निंदा किंवा स्तुती सारखीच असते.

३) न्यूनत्व बोधक- उदा. गड आला' पण सिंह गेला

४) परिणामबोधक- उदा. बसचा संप झाला म्हणून दळणवळण विस्कळीत झाले.

**घ)** वाक्य शुद्ध करून लिहा-

★ या उपप्रश्नास २ गुण आहेत.

★ प्रत्येक शब्दाला १ गुण आहे. अशुद्ध शब्द करून लिहावा

★ पाठ्यपुस्तकाच्या शेवटचे शुद्धलेखनाचे नियम अभ्यासावेत.

★ उदा. जेथे सहानुभूती नाहीं तेथे संयम नाही.

जेथे सहानुभूती नाही तेथे संयम नाही. किंवा

योग्य त्या ठिकाणी विरामचिन्हे देऊन वाक्ये पुन्हा लिहा- विरामचिन्हांचा वापर करा. हा पर्यायी प्रश्न विचारला जातो. पूर्वतयारी केलेला उपप्रश्न आत्मविश्वासाने निवडावा.

★ हा उपप्रश्न दोन गुणांचा आहे.

★ एकच वाक्य असेल.

★ दोन विरामचिन्हे उपयोगात आणावीत. प्रत्येकी १ गुण अशी विभागणी आहे.

★ पाठ्यपुस्तकातील वाचनात सूक्ष्मपणा हवा. उदा. पण मी कुठं धर्म सोडायला सांगते आहे. "पण मी कुठं धर्म सोडायला सांगते आहे ?"

**च)** कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून स्वत:च्या शब्दात वाक्यात उपयोग करा.

★ या उपप्रश्नास २ गुण आहेत.

★ चार वाक्प्रचारांपैकी २ वाक्प्रचार सोडवावेत.

★ अर्थपूर्ण वाक्य तयार करावे. वाक्प्रचाराचा उपयोग करावा.

त्याच्या अर्थाचा उपयोग करू नये.

★ अर्थास १/२ गुण व वाक्यात उपयोग करण्यास १/२ गुण आहे.

उदा. पाठबळ असणे- पाठिंबा असणे.

कोलंबसाला सहकारी खलाशांचे पाठबळ होते.

व्याकरणांतर्गत सर्व घटकांचा अभ्यास केल्यास हा प्रश्न, सर्वाधिक गुण देणारा आहे. कमी वेळात याचे लिखाण करून अधिक गुण मिळवा.

**उद्याचा विषय : विज्ञान I**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com